# दिनांक 11/03/2025

1 रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 19:30 वा च्या सुमारास नविन पोसरी मोहपाडा ता.खालापूर येथे महिला फिर्यादी रा.नविन पोसरी मोहपाडा ,ता. खालापूर यांचे घराच्या अंगणाचे वहिवाटिचे जुने वादावरून कुरापत काढुन कुत्री पिसाळलेली आहे बोलल्याचा गैरसमज करून घेवून आरोपी क्र.01 ते 03 यांनी संगनमत करुन फिर्यादी व त्यांचा मुलगा यांना शिविगाळी करुन हाताबुक्क्यांनी मारहाण केली तसेच महिला आरोपी क्र.02 हिने यांची साडी ओढून व गळयातील सोन्याची पोत तोडुन नुकसान केले तसेच आरोपी क्र.01 फिर्यादी यांचे उजवे हाताचे बोटांना चावा घेवून दुखापत केली तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.54/2025 भा.दं.वि.क.118, bns 118(2), 115(2),351(2),324(4),3 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/सचिन चौरे हे करीत आहेत.

2. रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 11:15 वा च्या सुमारास मौजे उरूस येथे होळीच्या मैदानावर ता.रोहा येथे आरोपीत क्र.01 व 02 यांनी फिर्यादि तसेच त्यांचा मुलगा वत्यांची पत्नी यांना दारू पिवून दमदाटी व शिवीगाळी केली म्हणुन फिर्यादि हे जाब विचारायला गेले असता अरोपीत क्र.01 फिर्यादिला म्हणाला कि,तुम्हाला भांडण करायचे आहेत काय तर आता मारून दाखवा मग दाखवतो. असे बोलून त्याने ज्याचा भाउ अरोपीत क्र.03 याला फोन करून जेवढी मुल असतील त्यांना घेवून ये यांना आज काय ते दाखवू असे बोलून अरोपीत क्र01 याने अरोपीच्या तोंडावर हातानी बुक्की मारली त्यावेळी फिर्यादि यांचा मुलगा व पत्नी तेथे भांडण सोडवण्यास आले त्यावेळी वरील अरोपीत यांचे सोबत फिर्यादि व त्यांचा मुलगा यांची हातापायी झाली .त्यावेळी अरोपीत क्र.01,02,व 03 आपसात संगनमत करून फिर्यादि यांचा मुलगा याला हाताबुक्क्यानी मारहान करून शिवीगाळी करून तुला घरात घुसुन मारू,घरातून गायब करू अशी दमदाटी करून फिर्यादि यांचे पत्नीस अरोपीत क्र 01 याने ढकलून दिले व हाताची बुक्की मारण्यास उगारून अंगावर मारण्यास धावून आला त्यावेळी फिर्यादिचा मुलगा याने त्यास पकडून ठेवले अन्यथा त्याने पत्नीस ही मारहान केली असती. अरोपीत क्र 01 याने फिर्यादि यांचे तोंडावर डावे बाजुस हाताची बुक्की मारल्याने फिर्यादी यांचा तोंडाल डाव्या बाजुचा खालचा एक दात पडून दुखापत केली.

याबाबत रोहा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 44/2025, भा.न्या.सं.का. कलम - 117(1),115(2)

,331, 352,351(2),3(5)-117(1),115(2),331, 352,351 (2), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/धायगुडे हे करीत आहेत.

3. खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 11:00 वा ते दि. 10/03/2025 रोजी 11:00 वा च्या दरम्यान मौजे फळमार्केट पार्किंग मधून खोपोली ता.खालापुर येथे फिर्यादी रा.निगडोली, पो.माजगांव ता.खालापुर यांची एकूण 12,000/-रुपये किंमतीची मोटरसायकल एम.एच.46.टी.3676 ही कोणीतरी अज्ञात चोरटयानी फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे हेतुन स्वताचे फयदया करीता चोरून नेली.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.73/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/श्री.आश्रफ तडवी हे करीत आहेत.

4. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 22:30 वा च्या सुमारास मौजे बळवली गावचे हददीत मुंबई गोवा महामार्गा पासुन पुर्वेस साधारण 100 मिटर अंतरावर दुरशेत गावात जाणा-या पक्का सिमेंट रस्त्याच्या बाजुला बाळगंगा नदीकाठी ता.पेण येथे कोणीतरी अज्ञात आरोपीत याने मयत अनोळखी अज्ञात महिला हिस कोणत्यातरी अज्ञात कारणास्तव कोठेतरी तिची हत्या करुन तिचे प्रेत सुटकेस बॅग मध्ये भरुन मौजे बळवली गावचे हददीत मुंबई गोवा महामार्गापासुन पुर्वेस साधारण 100 मिटर अंतरावर दुरशेत गावात जाणा-या पक्का सिमेंट रस्त्याच्या बाजुला बाळगंगा नदीकाठी पुरावा नष्ट करण्याचे उददेशाने टाकुन दिले.

याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.35/2025,भा.न्या.सं.2023 कलम 103(1),238(A) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि/श्री.संदीप बागुल हे करीत आहेत.

5. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 20:30 वा च्या सुमारास फिर्यादी रा.कैरे शिवाजीनगर खालापूर यांचा मुलगा वय-16 वर्ष यास दहावीचे पेपर चालु आहेत तु अभ्यास कर असे सांगिमल्याने तो रागाच्या भरात निघुन गेला होता त्याचा फिर्यादी यांनी आज पावेतो शोध घेतला तो मिळुन न आल्याने त्याचा अज्ञानपणाचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने त्यास फुस लावुन पळवुन नेले.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.56/2025, बी.एन.एस. 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.माळी हे करीत आहेत.

6. पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 15:00 वा च्या सुमारास मौजे नवीन वसाहत पेण ता.पेण येथे फिर्यादी रा.तरणखोप याने आरोपीत नं.01 याचे पिकअप गाडीला कट मारली असा मनात संशय व राग धरुन आरोपीत नं.1 याने फिर्यादीस शिवीगाळी करुन तुला भेटशिल तेथे मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादी हे आरोपीतास विचारण्यासाठी त्याचे गाडी पाठोपाठ जावुन आरोपी हा त्याचे घरासमोर थांबला असताना फिर्यादीने आरोपीस मला मारण्याची धमकी का दिलीस असे विचारले असता आरोपीत याने फिर्यादीस शिवीगाळी करुन

हाताबुक्यांनी मारहाण करुन आरोपीत नं.02 हिला बोलावुन तिने लोखंडी पाईप घेवुन येवुन फिर्यादीस शिवीगाळी करीत असताना आरोपीत नं.01 याने आरोपीत नं.02 हिचे हातातील लोखंडी पाईप घेवुन फिर्यादीचे हातावर व पाठीवर मारुन दुखापत केली.

याबाबत पेण पोलीस ठाणे येथे गु.र.नं.36/2025, भा.न्या.सं.2023 कलम 118(1) ,115, 352,351(2),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोह/घरत ह्या करीत आहेत.

7. म्हसळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/03/2025 रोजी 13:00 वा च्या सुमारास मौजे आगरवाडा गावाचे हददीतील ढव मोरीसमोर, म्हसळा येथे फिर्यादी रा.अगरवाडा ता.म्हसळा हे त्यांची गुरे चरवीत असताना आरोपीत रा.आगरवाडा ता,म्हसळा हा त्यांचे हातात सुरा घेउन येवुन फिर्यादी यांचे मालकिचा बैलाची जबरदस्तीने चोरी करून त्याचे घरात घेवुन जात असताना फिर्यादी यांनी बैलाची जबरदस्तीने चोरी करुन आरोपी याने त्यांचे घरात नेवुन बैलाच्या मानेवर सुरीने जखमा केल्या. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक 10/03/2025 रोजी 23:25 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत म्हसळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.16/2025, मुंबई पोलीस अधिनियम, 1951 चे कलम 119, भा. न्या.संहिता 2023 चे कलम 309(4),351 (2) (3),324(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.ज्ञानेश्वर एडवळे हे करीत आहेत.

8. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 12:30 वा च्या सुमारास मौजे तिघर येथील विटभटीवरुन ता.कर्जत येथे महिला फिर्यादी यांची मुलगी वय- 16 वर्षे 07 दिवस ही फिर्यादी काम करत असलेल्या तिघर येथील विटभैी वरुन बाथरुमला जाते असे सांगुन घरातुन निघुन गेली असुन ती अदयापर्यंत घरी परत आली नसुन ती अल्पवयीन असल्याने तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेवुन तिस फुस लावुन कोणीतरी अज्ञात इसमाने तिला आज्ञात कारणाकरीता अपहरण केले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.70/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे - 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.दबडे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 10.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 348 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,33,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.